**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रेसनोट**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत कचरा वेचकांच्या हातांना रोजगार देऊन त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी विशेष रोजगार मेळावा**

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या संकल्पनेतून व स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी शहरातील कचरा वेचकांना रोजगार मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून मा. आयुक्त यांच्या उपस्थितीत मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

मिरा भाईंदर महापालिकेचे कार्यक्षेत्र ७९ स्क्वेअर किलोमीटर इतके आहे. साधारण १४ लक्ष लोकसंख्या असलेल्या शहरात ४५० ते ५०० मॅट्रिक टन कचरा रोज निर्माण होत आहे. मिरा भाईंदर महापालिकेच्या एकूण सहा प्रभाग समितीच्या दोन झोनमध्ये विभागणी करून दैनंदिन साफसफाई करता कंत्राटी कर्मचारी आणि वाहनाद्वारे दररोज घरोघरी जाऊन ओला आणि सुका कचरा याचे वर्गीकरण करून उत्तन येथील प्रक्रिया प्रकल्पात तसेच बायोगॅस प्रकल्पामध्ये त्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे.

यासोबतच स्वच्छता निरीक्षक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार सध्या महानगरपालिका क्षेत्रात एकूण 131 कचरा वेचक कार्यरत आहेत. हे कचरा वेचक वैयक्तिकरित्या प्लास्टिक कचरा गोळा करून स्थानिक विक्रेत्यांना अगदी कमी किमतीत विकत आहेत त्यामुळे त्यांच्या रोजच्या उपजीविकेचा प्रश्न शाश्वत बनणे खऱ्या अर्थाने कठीण झाले आहे. महापालिका आयुक्त यांनी ही बाब लक्षात घेत महानगरपालिकेचे कचरा वेचकांना समृद्ध आणि सक्षम करण्यासाठी एक विशेष रोजगार मेळावा नगर भवन येथे आयोजित केला होता. या मेळाव्याला मिरा-भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रातील कचरा वेचकांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

बिसलरी या कंपनीच्या सहकार्याने या कचरा वेचकांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांना समृद्ध आणि सक्षम करण्यासाठी त्यांचे महापालिकेद्वारे बचत गट तयार करण्यात येणार असून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच बिसलेरी संस्थे मार्फत CSR फंड अंतर्गत MRF (Material Recovery Facility) प्लांट उभारण्यात येणार असून शहरातील प्लास्टिक कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून शहरातील डम्पिंगला जाणारा प्लास्टिक कचरा कमी होणार आहे.

"कचरा संकलकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्याचा हा अभिनव उपक्रम मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत राबविण्यात येणार आहे. शहरातील गरीब गरजू कचरा वेचकांनी स्वतःच आर्थिक सक्षमीकरण अधिक शाश्वत करण्यासाठी पुढे येऊन या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हा असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.